स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● गुरुवार, दिनांक २१ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# गुणांसाठी बाजार मांडलाय तर दुसरीकडे जातीतीलच विद्यार्थ्यांकडे लक्ष द्यायचे, असा काही नीच औलादींनी विडा उचलला!!

**नीट सारख्या परीक्षा आता गुणांसाठी आहेत त्या मूल्यांसाठी राहिलेल्या नाहीत, असा ठाम समज आता सर्वदूरपर्यंत पसरला आणि तो सत्य आहे!!**

**आपल्याकडील शिक्षण व्यवस्था म्हणजे नुसते करिअर घडविण्याचे साधन नाही. तर ते राष्ट्राच्या भविष्यातील बौद्धीक आणि नैतिक जडघडणीचा खंबीर पाया आहे!!**

**कोटींची उलाढाल असणा-या शिकवणीच्या धंद्याला आवरा घालणे मुश्किल झाले, कारण या धंद्याला बळ देणाऱ्यांमध्ये मिंद्यांचीच संख्या जास्त झाली?**

## शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही काही जण जात आणत असतील तर त्यांच्यासारखे नीच तेच!!

**बीड : सलग तीन वर्षांपासून नीटचा हा घोळ संपवण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे आपल्या येथील शिक्षण व्यवस्था सपशेल नापास झाली आहे. तसं पाहिलं तर सं बंध शिक्षण व्यवस्थेतील घडून गेलेली व घडत असलेल्या अनेक प्रकारच्या कारनाम्यांची यादी प्रचंड मोठी आहे. ती थांबता थांबत नाही, असेच नाइलाजाने म्हणावे लागत आहे. ही टयुशन व्यवस्था विद्यार्थी, पालक आणि यांच्या मुळावर उठली आहे. या परीक्षा गुणांसाठी आहेत की मूल्यांसाठी हे गुंतागुंतीचे कोडे सुटायचे नाव घेत नाही. आपल्याकडील शिक्षण व्यवस्था म्हणजे नुसते करिअर घडविण्याचे साधन नाही. तर ते राष्ट्राच्या भविष्यातील बौद्धीक आणि नैतिक जडघडणीचा एक खंबीर असा पाया आहे. परंतु नीट सारखा पेपर फुटतो तेव्हा तो किरकोळ गुन्हा कसा मानायचा हा प्रश्न डोळ्यात खोलवर बोटे घातल्याशिवाय सोडत नाही. तर दुसरीकडे खाजगी शिकूनच नव्हे तर शाळा महाविद्यालयांमध्ये देखील आपल्या जातीच्या विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याचा विडा काही नीच औलादींनी उचलल्याचे स्पष्ट बोलले जात आहे, आणि दिसूनही येत आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात आता हे फॅड चांगलेच रुजले आहे. ज्या नीच औलादींनी हा विडा उचलला आहे, त्यांना गुरु म्हणण्याची त्यांची लायकी राहिली नाही, अशा ना-लायकांमुळे शिक्षण क्षेत्राला काळीमा फासली जात आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया आता व्यक्त होऊलागल्या आहेत.**

● नीट काय सर्वच स्पर्धा परीक्षेत आधीच जीवघेणी स्पर्धा आहे. मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या परिस्थितीत अस्वस्थ वाटत आहे. तर पैसा आणि इतर मार्गांनी यश मिळविणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांच्या चेहऱ्यावर आनंद तरंग ओसांडून वाहत आहे. मग अशा परिस्थितीत प्रगत देश म्हणवून घेण्यासाठी आपल्याला कोणता नैतिक अधिकार मिळतो आहे हा चिंताजनक प्रश्न पडतो. या पेपरफूटीत तांत्रिक चुका किंवा अडचणी नाहीत. तर सामाजिक भान हरपून गेलेल्या प्रवृत्ती, त्यांच्या टोळ्या यांचा केवळ आर्थिक लूटीसाठी चाललेला हा खेळ आहे.

● नीटच काय कोणतीही परीक्षा संवेदनशील असायलाच हवी. एखादा वैद्यकीय विद्यार्थी चुकीच्या मार्गातून तो पुढे डॉक्टर झाला आणि त्याच्या हातून रुग्णावर चुकीचे उपचार झाले तर ही झालेली चूक जीवघेणी ठरु शकते. हे लक्षात का घेतले जात नाही हा कळीचा मुद्दा आहे.

**पेपरफूटीत तांत्रिक चुका किंवा अडचणी नाहीत तर सामाजिक भान हरपून आर्थिक लूटीचा हा खेळ!!**




## सेटिंगचे धोरण अवलंबून विद्यार्थ्यांना करिअर विकले जातेय!!

● शाळा महाविद्यालयातून विद्यार्थी वर्गास शिकवणे (अपवाद वगळता) हेच कमी झाले आहे. म्हणून अतिरिक्त शिकवणी वर्ग लावण्याची वेळ विद्यार्थी व पालकांवर आली आहे. विद्यार्थी नसल्याने शाळा/महाविद्यालय ओस पडत चालली आहेत. शिकवणेच नाही तेथे गुणवत्ता कशी दिसेल. आणि त्यात लाखो रुपयांच्या ट्युशन्सचे फॅड हे सारं ऐकलं म्हणजे मेंदूचा चुरा झाल्याशिवाय राहत नाही.

● याच सर्व गोष्टींचा परामर्श आणि या ट्युशन्स संस्कृतीची आर्थिक उलाढाल बघितली की, सद्यस्थितीत समाजाला विचार करण्यास भाग पाडते. या टयुशन संस्कृतीमुळे कनिष्ठ महाविद्यालय ओस पडली. तेथील काही प्राध्यापक मंडळी मग मोटेगावकर असो की इतर ट्युशन्समध्ये चोरून लपून शिकवू लागली. यामुळे दोन पगार आणि सगळी मजा या प्राध्यापक मंडळीत दिसू लागली. आणि मग याच अमाप पैशातून नको ते उद्योग घडू लागले हे ज्ञात आहे.

● याला संस्थाचालक, शिक्षण विभाग यांचीही नकळत मूकसंमतीच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. लाखो रुपयांच्या ट्युशन्स फीस घेऊन आणि त्यात सेटिंग धोरण अवलंबून विद्यार्थ्यांना करिअर विकले जात असेल हे कुठेतरी का थांबत नाही. हे असले प्रकार घडत असतील तर आणि यंत्रणा कुंभकर्णी झोपेत राहून कठोर निर्णय का घेत नाही हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे.

**शिकवणीचा धंदा आताच आवरला नाही तर शिक्षणाची माती झाल्याशिवाय राहणार नाही!!**

मोटेगावकर सारख्या मंडळीचे गावोगावी पीक जोमाने पिकू पाहत आहे. यांचे रसायनशास्त्र अजब रसायन म्हणून नावारूपास येत आहे. गलेलठ्ठ पालकांना हेरून घेण्यात यांचे रसायन कामी येत आहे. त्यांच्या रसायनाची आर्थिक उलाढाल ऐकली तर चक्कर आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या ट्युशनच्या कारखान्यांना आळा घालणे तितकेच गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षा पध्दती कठोर करणे, शिकवणी वर्ग बंद करणे, शाळा महाविद्यालयात विद्यार्थी उपस्थिती अनिवार्य करून त्यावर सतत लक्ष ठेवणे, विद्यार्थी आणि पालकांना शाळा महाविद्यालयातून येथेच क्लास होतील असा विश्वास देणे आवश्यक आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपला पाल्य या फॅक्टरीत टिकू शकेल याची स्वमत चाचणी देखील करणे आवश्यक बनत चालले आहे. शेवटी हा वाढत चाललेला शिकवणीचा धंदा आताच आवरण्याची नितांत गरज असून त्यास जर आवर न घातला तर शिक्षणाची मात्र माती माती झाल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र निश्चित!!

## भाजी-फळ विक्रेत्यांवर कारवाई; मात्र बिंदुसरा अतिक्रमणांबाबत प्रशासन मौन – डॉ. गणेश ढवळे यांचा आरोप

➤ बीड / प्रतिनिधी : बीड शहरातील मुख्य भाजी मंडई परिसरात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या भाजीपाला व फळ विक्रेत्यांवर अतिक्रमण हटाव मोहिमेअंतर्गत कारवाई करणारे नगरपरिषद प्रशासन बिंदुसरा नदीपात्रातील मोठ्या अतिक्रमणांबाबत मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे की, विभागीय आयुक्तांनी दोन वेळा आदेश देऊनही बिंदुसरा नदीपात्रात टाकण्यात आलेले भराव, नदीचा बदललेला प्रवाह,



बुजविण्यात आलेले ओढे तसेच अनधिकृत बांधकामांवर अद्याप प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही. दुसरीकडे, हातावर पोट असलेल्या भाजी व फळ विक्रेत्यांवर मात्र नगरपरिषद प्रशासन कठोर कारवाई करत असल्याची टीका त्यांनी केली.

**विभागीय आयुक्तांच्या आदेशांनंतरही कारवाई नाही :**



बिंदुसरा नदीपात्रात काही ठिकाणी कचरा टाकून भराव घालणे, प्लॉटिंग करणे, रस्ते तयार करणे आणि बांधकामे उभारणे असे प्रकार सुरू असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती.

त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथील सहाय्यक आयुक्त (नगर परिषद प्रशासन) डॉ. निलम पाटील यांनी २९ मे २०२३ आणि २८ जून २०२३ रोजी बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना संबंधित अतिक्रमणांवर ठोस कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशांची अद्याप प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**पूरधोक्याबाबत चिंता :** १९८९ मध्ये बिंदुसरा नदीला आलेल्या महापुराचा संदर्भ देत, नदीकाठावरील पुर नियंत्रण रेषा (निळी व लाल रेषा) तातडीने निश्चित करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. ढवळे यांनी नमूद केले. यासाठी नगरपरिषद, जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभागाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला असला तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले.

नदीपात्रातील वाढते अतिक्रमण आणि नदीच्या नैसर्गिक प्रवाहात होत असलेले बदल यामुळे भविष्यात पूरस्थिती निर्माण होऊन जिवित व वित्तहानी झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

### महत्वाचे ढळक मुद्दे

● भाजीपाला व फळ विक्रेत्यांवरील कारवाईवरून नगरपरिषद प्रशासनावर टीका. ● बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमणांवर कारवाई न झाल्याचा आरोप. ● विभागीय आयुक्तांच्या आदेशांची अंमलबजावणी झालेली नसल्याचा दावा. ● नदीपात्रातील भराव, प्लॉटिंग व अनधिकृत बांधकामांमुळे पूरधोक्याची शक्यता व्यक्त. ● पुर नियंत्रण रेषा निश्चित करण्याची मागणी पुन्हा अधोरेखित.

## आडत मार्केटमध्ये व्यापाऱ्यांचे अतिक्रमण राजरोस सुरू! भिंती फोडल्या, शेड उभारले!! मग इथे नगरपरिषद प्रशासनाला मोतिबिंदू झालाय काय?

बीड : प्रतिनिधी

बीड शहरातील आडत मार्केट परिसरात नगरपालिकेच्या जागेवर व्यापाऱ्यांनी भिंती फोडुन अनधिकृत पत्राशेड उभारून अतिक्रमण केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. भाजी मंडईतील लहान व्यावसायिकांवर कारवाई करणारे नगरपरिषद प्रशासन आडत मार्केटमधील धनदांडग्या व्यापाऱ्यांच्या अतिक्रमणाकडे मात्र डोळेझाक करत असल्याने नगरपरिषद प्रशासनाला मोतिबिंदू झालाय का? अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

डॉ. ढवळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, नगरपालिकेने आडत मार्केटमधील गाळे भाडे तत्वावर दिलेले असताना काही व्यापाऱ्यांनी नगरपालिकेच्या भिंती फोडून त्या ठिकाणी बेकायदेशीर पत्राशेड उभारले आहेत. दिवसाढवळ्या तोडफोड करून नगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान करण्यात आले असून मोकळ्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे.

"भाजी व फळ विक्रेत्यांवर दांडगाई करणाऱ्या प्रशासनाला हे अतिक्रमण दिसत नाही काय? मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना मोतिबिंदू झालाय का?" असा संतप्त सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.






### नोटीसनंतरही कारवाई शून्य

नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव यांनी दि. ७ एप्रिल २०२६ रोजी संबंधित सहा व्यापाऱ्यांना चार दिवसांत अतिक्रमण काढण्याच्या नोटिसा बजावल्या होत्या. अन्यथा कारवाईचा इशाराही देण्यात आला होता. मात्र महिनाभराहून अधिक कालावधी उलटूनही परिस्थिती जैसे थे असल्याचे दिसून येत आहे. नोटीस देणाऱ्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनाही काही व्यापाऱ्यांकडून राजकीय पाठबळाच्या जोरावर अरेरावीची भाषा केली जात असल्याची चर्चा परिसरात सुरू असल्याचेही डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत ःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# 'लातूर पॅटर्न' हा शेतकऱ्यांच्या मुलांच्या घामातून जन्माला आलेला इतिहास आहे

## 'मोटेगावकर' आणि कोचिंग क्लासेस म्हणजे 'लातूर पॅटर्न' नव्हे !

विशेष
डॉ. अमोल गित्ते
राजर्षी शाहू महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी

सध्या माध्यमांमध्ये आणि सोशल मीडियावर "लातूर पॅटर्न" या शब्दाचा अत्यंत चुकीच्या पद्धतीने वापर होताना दिसतो आहे. काही कोचिंग क्लासेस, काही व्यक्ती आणि पेपरफुटीसारखे घृणास्पद प्रकार यांना "लातूर पॅटर्न"शी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही केवळ चुकीची मांडणी नाही, तर महाराष्ट्रातील लाखो कष्टकरी विद्यार्थ्यांच्या इतिहासावर अन्याय करणारी गोष्ट आहे.

सर्वप्रथम एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल — "मोटेगावकर" किंवा कुठलाही कोचिंग क्लास म्हणजे "लातूर पॅटर्न" नव्हे. हे माध्यमांनी तयार केलेलं एक कृत्रिम आणि दिशाभूल करणारं चित्र आहे.

खरा "लातूर पॅटर्न" हा ना एसी क्लासरूममध्ये जन्माला आला, ना लाखो रुपयांच्या फीमध्ये उभा राहिला. तो जन्माला आला मराठवाड्याच्या कोरड्या मातीत. तो तयार झाला शेतकऱ्यांच्या मुलांच्या घामातून, त्यांच्या आई-वडिलांच्या त्यागातून आणि काही ध्येयवेड्या शिक्षकांच्या अथक परिश्रमातून.

"लातूर पॅटर्न" ही कोणत्याही कोचिंग क्लासवाल्याची मालमत्ता नाही. तो एका संपूर्ण पिढीच्या संघर्षाचा इतिहास आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. अनिरुद्ध जाधव, डॉ. जनार्दन वाघमारे, दिवंगत गोपाळराव पाटील आणि अनेक समर्पित शिक्षकांनी एक शैक्षणिक संस्कृती उभी केली. त्यांनी विद्यार्थ्यांना फक्त अभ्यास शिकवला नाही, तर "ध्येयासाठी झपाटून जगणं" शिकवलं.

त्या काळात लातूरमध्ये लाखो रुपयांचे कोचिंग क्लासेस नव्हते.
मोठमोठे ऑडिटोरियम नव्हते.



एसी हॉल नव्हते. भव्य जाहिराती नव्हत्या. बाहेरून आयात केलेले स्टार शिक्षक नव्हते.
होतं ते फक्त एकच —
"कष्ट."
सकाळपासून संध्याकाळपर्यंत अभ्यास. दर आठवड्याला टेस्ट. सततची रिव्हिजन. आणि डॉक्टर व्हायचं, इंजिनिअर व्हायचं, घर बदलायचं या एका स्वप्नासाठी पेटलेली मुलं.

या मुलांपैकी अनेकांच्या वडिलांकडे साधी दोन एकर कोरडवाहू शेती सुद्धा नव्हती. अनेक मुलं अशा गावांतून आलेली होती जिथे लोकसंख्या हजार-दोन हजाराच्या पुढे नव्हती. कुणाचे वडील शाळेत शिक्षक होते, कुणी साधे सरकारी कर्मचारी, कुणी शेतमजूर, कुणी किराणा दुकान चालवणारे. पण त्या प्रत्येक घरात एक स्वप्न होतं — "माझं मूल शिकून मोठं व्हावं."

आणि त्या स्वप्नाला आकार देणारं नाव म्हणजे "लातूर पॅटर्न". आमच्यासारख्या गोरगरीब शेतकरी कुटुंबातील हजारो विद्यार्थ्यांना घडवणारा हा "लातूर पॅटर्न" आहे. हा पॅटर्न नसता तर आज आम्ही डॉक्टर नसतो, इंजिनिअर नसतो, प्रशासनात नसतो, देशभर विविध जबाबदाऱ्या सांभाळत नसतो. आमच्या आयुष्याला दिशा देणारा, आमच्या घरात आशेचा दिवा लावणारा हा "लातूर पॅटर्न" आहे. त्यामुळे कृपया या "लातूर पॅटर्न"ला बदनाम करू नका. कोचिंग क्लासेसमध्ये जे काही गैरप्रकार होत असतील, ज्यांनी शिक्षणाचा बाजार मांडला असेल, ज्यांनी पैशासाठी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केलाय — त्यांच्यावर बोला, त्यांना जाब विचारा, त्यांना बदनाम करा. पण लाखो गरीब विद्यार्थ्यांच्या संघर्षावर उभ्या असलेल्या "लातूर पॅटर्न"वर चिखलफेक करू नका.

आज महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात जा — मोठ्या हॉस्पिटलमध्ये, मेडिकल कॉलेजमध्ये, प्रशासनात, इंजिनिअरिंग क्षेत्रात — तुम्हाला हजारो डॉक्टर, इंजिनिअर्स आणि अधिकारी भेटतील जे छोट्या खेड्यातून आले आणि "लातूर पॅटर्न"मुळे घडले.

हा पॅटर्न पैसा खर्च करून तयार झालेला नव्हता. तो मेहनतीने घडलेला होता. आज काही कोचिंग क्लासेसवाल्यांनी "लातूर पॅटर्न"ची नक्कल करण्याचा प्रयत्न केला असेल. लाखो रुपये खर्च करून यूपी-बिहारमधून शिक्षक आणले असतील. भव्य इमारती बांधल्या असतील. मोठमोठ्या जाहिराती दिल्या असतील. पण त्या सगळ्याला "लातूर पॅटर्न" म्हणता येणार नाही. कारण "लातूर पॅटर्न" ही इमारत नव्हती. ती मानसिकता होती.
ती शिस्त होती. ती ध्येयवेड होती. ती गरीब घरातील मुलांच्या डोळ्यातील आग होती. खरा "लातूर पॅटर्न" हा राजर्षी शाहू कॉलेजमध्ये तयार झाला. तिथल्या शिक्षकांनी स्वत ःच्या रक्ताचं पाणी करून तो उभा केला. डॉ. अनिरुद्ध जाधव यांच्यासारख्या ध्येयवेड्या प्राचार्यांच्या संकल्पनेतून तो जन्माला आला. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्कांसाठी नव्हे, तर आयुष्य बदलण्यासाठी शिकवलं.
आज माध्यमांनी आणि समाजाने एक गोष्ट समजून घेतली पाहिजे —पेपरफुटी करणारे, शिक्षणाचा बाजार मांडणारे, लाखो रुपये घेणारे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारे लोक "लातूर पॅटर्न"चे प्रतिनिधी नाहीत. ते "लातूर पॅटर्न"वर जगले असतील. त्याच्या नावाचा वापर केला असेल. पण ते "लातूर पॅटर्न" नाहीत.
"लातूर पॅटर्न" म्हणजे —
आईच्या डोळ्यातलं स्वप्न.
वडिलांच्या कपाळावरचा घाम.
आणि मुलाच्या हातातलं पुस्तक.
तो शेतकऱ्यांच्या मुलांच्या कष्टाचा इतिहास आहे.
त्याला बदनाम करू नका.
अकरावी-बारावीचे ते दिवस आठवले की आजही अंगावर काटा येतो. डोळ्यांमध्ये नकळत पाणी येतं. त्या काळात आम्ही फक्त अभ्यास करत नव्हतो, तर आयुष्याशी लढत होतो. गावाकडच्या मातीमधून आलेली, शेतकऱ्यांच्या घरात वाढलेली हजारो मुलं स्वत ःचं आयुष्य बदलण्यासाठी झगडत होती. आज "लातूर पॅटर्न" बद्दल चुकीच्या पद्धतीने बोललं जाताना मनाला प्रचंड वेदना होतात. कारण हा फक्त एक शिक्षणाचा पॅटर्न नव्हता — हा हजारो विद्यार्थ्यांच्या घामाचा, संघर्षाचा आणि रक्ताच्या थेंबाचा इतिहास होता.

ज्या मुलांनी दिवसरात्र जागून अभ्यास केला ज्यांच्या आई-वडिलांनी उपाशी राहून फी भरली ज्यांनी गाव सोडून लातूरमध्ये स्वप्न उभी केली त्या मुलांच्या कष्टाला आज बदनाम केलं जातंय, हे पाहून डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहत नाही. कृपया "लातूर पॅटर्न"ला बदनाम करू नका.

कोचिंग क्लासेसवाल्यांनी काही गैरप्रकार केले असतील, कुणी पैशासाठी शिक्षण विकलं असेल, तर त्यांना दोष द्या. पण ज्या "लातूर पॅटर्न"ने हजारो गरीब विद्यार्थ्यांचं आयुष्य घडवलं, त्याला आरोपी ठरवू नका.

हा पॅटर्न म्हणजे आमच्या आयुष्याचा संघर्ष आहे. आमच्या आई-वडिलांच्या त्यागाचा इतिहास आहे. आणि आमच्या घामाचा इतिहास आहे. तो आमचा श्वास आहे.



# नीट पेपरफुटी : शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरचा घाला

विशेष

प्रवीण बागडे
नागपूर मो.क्र. ९९२३६२०९१९

देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णय ठरवणारी आणि वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वार मानली जाणारी नीट परीक्षा आज गंभीर संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा केवळ एक शैक्षणिक प्रक्रिया नसून आयुष्य घडवणारा टप्पा असतो. परंतु, या परीक्षेत झालेल्या कथित पेपरफुटी, गुणांमधील संशयास्पद वाढ, परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवस्था आणि संगनमताच्या आरोपांनी देशातील शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हताच डळमळीत केली आहे. ही केवळ एका परीक्षेची चूक नाही तर हा देशातील शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक अध ःपतनाचा आणि सरकारी यंत्रणांच्या अपयशाचा गंभीर इशारा आहे.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी युद्धभूमीच बनली आहे. लाखो विद्यार्थी दोन-दोन, तीन-तीन वर्षे कठोर परिश्रम करून नीटची तयारी करतात. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून, शेतकरी कुटुंबातून, आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थितीतून पुढे येतात. काहींचे पालक शेती विकतात, काही कर्ज काढतात, तर काही स्वत ःच्या गरजा कमी करून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतात. विद्यार्थीदेखील मित्र, मनोरंजन, सण-उत्सव यापासून दूर राहून दिवसाचे १२ ते १४ तास अभ्यास करतात. अशा वेळी जर प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच बाजारात विकली जात असेल, तर मेहनतीवर उभ्या असलेल्या व्यवस्थेचा पाया कोसळल्याशिवाय राहत नाही.

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील विद्यार्थ्यांच्या मनात एक धोकादायक प्रश्न निर्माण केला आहे, "मेहनत करून खरंच यश मिळते का?" हा प्रश्न केवळ भावनिक नाही तर तो शिक्षण व्यवस्थेच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. जेव्हा पैशांच्या जोरावर प्रश्नपत्रिका मिळवणारे विद्यार्थी प्रामाणिक विद्यार्थ्यांपेक्षा पुढे जातात, तेव्हा गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि स्पर्धेतील समान संधी या लोकशाही मूल्यांचाच पराभव होतो. गरीब विद्यार्थी अभ्यास करतो आणि श्रीमंत व्यवस्था विकत घेतो, अशी भावना समाजात निर्माण होणे ही अत्यंत धोकादायक बाब आहे.

या प्रकरणात राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील सर्वात महत्त्वाच्या परीक्षांपैकी एक असलेल्या नीट सारख्या परीक्षेची प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल, तर ही बाब सामान्य नाही. डिजिटल इंडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, बायोमेट्रिक तंत्रज्ञान अशा आधुनिक सुविधांचा गजर करणाऱ्या देशात परीक्षा सुरक्षेतील एवढी मोठी त्रुटी कशी राहू शकते? प्रश्नपत्रिका छपाईपासून वितरणापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत जर गोपनीयता राखली जाऊ शकत नसेल, तर यंत्रणेत खोलवर भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणा शिरल्याचे स्पष्ट होते.

या संपूर्ण घोटाळ्यामागे केवळ काही विद्यार्थी किंवा दलाल नसून एक संघटित रॅकेट कार्यरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही तपासांत दलाल, कोचिंग क्लासेस, स्थानिक अधिकारी आणि राजकीय संरक्षण असलेल्या टोळ्यांचे संगनमत असल्याचे आरोप समोर आले. शिक्षण हे ज्ञान, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे क्षेत्र असताना त्याला बाजारपेठ बनवण्याचा उद्योग सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. वैद्यकीय शिक्षणात प्रवेश मिळवण्यासाठी लाखो नव्हे तर कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होतात, अशा चर्चा उघडपणे होत आहेत. ही परिस्थिती देशासाठी अत्यंत चिंताजनक आहे. कारण उद्या जर पैशाने प्रवेश मिळवलेले विद्यार्थी डॉक्टर बनले, तर त्याचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित राहणार नाही; तो थेट जनतेच्या आरोग्यावर होणार आहे.




पेपरफुटी प्रकरणाचा सर्वात गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत आहे. स्पर्धा परीक्षांचे दडपण आधीच प्रचंड असते. त्यात परीक्षा रद्द होईल का, पुन्हा परीक्षा घ्यावी लागेल का, निकालावर परिणाम होईल का, या अनिश्चिततेमुळे लाखो विद्यार्थी मानसिक तणावाखाली आले आहेत. अनेक विद्यार्थी नैराश्य, चिंता आणि भीती अनुभवत आहेत. देशाने यापूर्वी स्पर्धा परीक्षांच्या तणावामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्याही पाहिल्या आहेत. त्यामुळे अशा घटनांकडे केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर मुद्दा म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. ही पिढीच्या मानसिक सुरक्षिततेची बाब आहे. दुर्दैवाने, अशा गंभीर विषयांवरही राजकारण सुरू होते. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात व्यस्त असतात; पण विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत ठोस भूमिका घेणारे फार कमी दिसतात. संसदेत गदारोळ होतो, पत्रकार परिषदांत आरोप होतात, चौकशांच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात दोषींना शिक्षा होण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबते. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात "मोठे लोक वाचतात आणि सामान्य विद्यार्थी भरडले जातात" अशी भावना निर्माण होते. ही भावना लोकशाहीसाठी घातक आहे.

भारतात पेपरफुटीचे प्रकार नवीन नाहीत. विविध राज्यांतील भरती परीक्षा, पोलीस भरती, शिक्षक भरती, एमपीएससी, रेल्वे परीक्षा अशा अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये यापूर्वीही गैरप्रकार उघड झाले आहेत. म्हणजेच समस्या केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण प्रणालीतील भ्रष्टाचार आणि कमकुवत नियंत्रण यंत्रणेची आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी कमी असताना स्पर्धा वाढते, आणि त्यातूनच गैरप्रकारांचे जाळे अधिक मजबूत होत जाते. बेरोजगारी आणि स्पर्धेच्या भीषण दडपणात अडकलेल्या समाजात परीक्षा ही काहींसाठी "व्यवसाय" बनते, हे वास्तव नाकारता येणार नाही.

या परिस्थितीत सरकारने केवळ आश्वासने देऊन चालणार नाही. कठोर आणि परिणामकारक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम परीक्षा प्रक्रियेला पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक बनवणे गरजेचे आहे. प्रश्नपत्रिकांची छपाई, वाहतूक आणि वितरणासाठी एंड-टू-एंड डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली लागू करावी. प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्चित करावी. परीक्षा केंद्रांवर बायोमेट्रिक पडताळणी, एआय-आधारित निरीक्षण, सायबर सुरक्षा आणि स्वतंत्र नियंत्रण कक्ष यांची अंमलबजावणी केली पाहिजे. प्रश्नपत्रिका गळतीसारख्या गुन्ह्यांना दहशतवादी किंवा आर्थिक गुन्ह्यांइतकीच गंभीर वागणूक देऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. याशिवाय, परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यासाठी कायमस्वरूपी स्वायत्त प्राधिकरण निर्माण करणे आवश्यक आहे. राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त आणि न्यायालयीन अधिकार असलेली स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली तरच अशा प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल. चौकशी समित्यांच्या घोषणा करून प्रकरण दडपण्याची जुनी पद्धत आता थांबली पाहिजे. दोषींना जलदगती न्यायालयांतून शिक्षा झाली तरच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसेल.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. शिक्षण म्हणजे केवळ गुणांची स्पर्धा नाही, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे, हा संदेश समाजात पोहोचवणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकू नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अपयश स्वीकारण्याची ताकद द्यावी. सरकारने प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशन केंद्रे सुरू करून स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक आधार उपलब्ध करून द्यावा. कारण परीक्षा महत्त्वाची असली तरी विद्यार्थ्यांचे जीवन त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याची. विद्यार्थी जर व्यवस्थेवरच विश्वास ठेवेनासे झाले, तर देशाच्या प्रगतीचा पाया हादरेल. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि समान संधी टिकवून ठेवण्यासाठी सरकार, न्यायव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. अन्यथा "मेहनतीपेक्षा पैशाला महत्त्व" ही मानसिकता अधिक बळावेल आणि समाजातील नैतिक मूल्यांचे अध ःपतन वेगाने वाढेल. नीट पेपरफुटी प्रकरण हे एका परीक्षेपुरते मर्यादित नाही; ते भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले आरसे आहे. त्या आरशात भ्रष्टाचार, निष्काळजीपणा, राजकीय हस्तक्षेप आणि व्यवस्थेतील ढासळलेली नैतिकता स्पष्ट दिसत आहे. या आरशाकडे डोळेझाक करून चालणार नाही. कारण आज जर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना रोखले नाही, तर उद्या देशाच्या भविष्यालाच मोठी किंमत मोजावी लागेल.

विशेष

# खानापूर ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच पदच्युत

## अप्पर विभागीय आयुक्तांकडून जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय कायम

➤ **माजलगाव / प्रतिनिधी :** तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या खानापूर ग्रामपंचायतीचे सरपंच पंडित बाजीराव आबुज आणि उपसरपंच सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांना पदावरून हटविण्याचा बीड जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अप्पर विभागीय आयुक्त कार्यालयानेही कायम ठेवला आहे. या निर्णयामुळे खानापूरच्या स्थानिक राजकारणात पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले असून नव्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या खानापूर ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर विकास खंडू कांबळे यांनी सरपंच व उपसरपंच यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याची तक्रार बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी व पंचनामा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी खानापूर येथे प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामपंचायतीचे अभिलेख तपासले. चौकशी अहवालात शासकीय जागेवर अतिक्रमण झाल्याचे तसेच अभिलेखांमध्ये फेरफार करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याचे नमूद करण्यात आले.

दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे विचारात घेऊन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सरपंच व उपसरपंचांना पदच्युत करण्याचा आदेश दिला होता. या आदेशाविरोधात संबंधितांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. खंडपीठाने २१ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला तात्पुरती स्थगिती देत प्रकरणाचा अंतिम निर्णय चार आठवड्यांत विभागीय आयुक्तांनी घ्यावा, असे निर्देश दिले होते.

यानंतर अप्पर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी दोन्ही बाजूंची सुनावणी घेतली. सुनावणीनंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय योग्य व कायदेशीर असल्याचे नमूद करत अपील फेटाळून लावले आणि पदच्युतीचा आदेश कायम ठेवला. प्रकरणात मूळ तक्रारदार विकास कांबळे यांच्या वतीने ॲड. शशीकांत शेकडे आणि ॲड. विशाल थावरे यांनी काम पाहिले, तर सरपंच व उपसरपंच यांच्या वतीने ॲड. सुदर्शन सोळंके आणि ॲड. महेंद्र गंडले यांनी बाजू मांडली.

### आदेशातील महत्तवाची निरीक्षणे

अप्पर विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार, ग्रामपंचायत नमुना क्रमांक ८, अतिक्रमण नोंदवही आणि चौकशी अहवालाच्या परीक्षणातून मालमत्ता क्रमांक १७४ संदर्भात अभिलेखांमध्ये फेरफार झाल्याचे स्पष्ट दिसून येते. तसेच मालमत्ता क्रमांक २०८ ही उद्यानासाठी राखीव असलेली शासकीय जागा असून त्यावर सुमारे २०० चौरस फूट आरसीसी बांधकाम झाल्याची नोंद अतिक्रमण रजिस्टरमध्ये आढळून आली आहे. शासकीय अभिलेखांमधील या नोंदी महत्त्वाच्या असून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी उपलब्ध पुरावे, चौकशी अहवाल आणि कायदेशीर तरतुदींचा सखोल विचार करूनच अपात्रतेचा निर्णय दिला असल्याचे नमूद करत अप्पर विभागीय आयुक्तांनी त्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे.

- खानापूर ग्रामपंचायतीचे सरपंच पंडित आबुज व उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर यांना मोठा धक्का.
- शासकीय जागेवरील अतिक्रमण व अभिलेखांतील फेरफार प्रकरणी कारवाई.
- बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या पदच्युतीच्या निर्णयाला अप्पर विभागीय आयुक्तांची दुजोरा.
- उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर अपीलावर सुनावणी.
- स्थानिक राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता.

# सिंदफणा पब्लिक स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

## ➤ इयत्ता पाचवीचे १८ तर आठवीचे १३ विद्यार्थी पात्र

➤ **अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**

येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सिंदफणा पब्लिक स्कूलने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेतील इयत्ता पाचवीचे १८ आणि इयत्ता आठवीचे १३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून त्यांच्या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक कार्याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.




इयत्ता पाचवीमधून आरुष खोले, आदित्य देशमुख, ईश्वरी आकुसकर, ख्याती तातेड, मयंक जाधव, परिधी रेदासनी, प्रथमेश सोळंके, पृथ्वीराज तौर, सई कदम, सान्वी देशमुख, सर्वेश साबळे, शिवराज चव्हाण, श्रेया चव्हाण, सुहृदा कुलकर्णी, स्वरा काळे, स्वराज सुरेवाड, स्वराली सोळंके आणि स्वरांजली रोडे या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. तर इयत्ता आठवीमधून आरव भुतडा, आरुष गडम, अक्षिका रेदासनी, आराध्या राठोड, भक्ती गंगणे, हरीश जोगडे, ओंकार कंटुले, रेणुका गवारे, शर्वरी देशमुख, श्रेया ढोणे, वरुण कवचट, वेदिका गवते आणि वेदिका आगे यांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव, शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांची जिद्द व मेहनत महत्त्वाची ठरली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत सिंदफणा पब्लिक स्कूलची उल्लेखनीय कामगिरी.
- इयत्ता पाचवीचे १८ व इयत्ता आठवीचे १३ विद्यार्थी पात्र.
- शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि नियमित सरावामुळे यश.
- विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांमधील यशाची परंपरा कायम.
- विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव ; परिसरात शाळेचे कौतुक.


प्राचार्य, शेख अन्वर

सिंदफणा पब्लिक स्कूलने यापूर्वीही विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. ऑलिम्पियाड परीक्षा, होमी भाभा परीक्षा, सीबीएसई ग्रीन ऑलिम्पियाड, सीबीएसई रीडिंग चॅलेंज आणि सीबीएसई एक्स्प्रेशन सिरीज यांसारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष विरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य सुवर्णा शिंगणे, सौदागर साखरे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून सर्वत्र कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

# भगवान पुरुषोत्तमाचे चांदीचे नाणे प्रथमच उपलब्ध; जयसिंग सोळंके व नगराध्यक्ष चाऊस यांच्या हस्ते शुभारंभ

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय असलेल्या येथील ठोंबरे सराफचे संचालक महेश ठोंबरे यांनी भगवान पुरुषोत्तमाचे आकर्षक चांदीचे नाणे प्रथमच तयार केले असून, त्याच्या विक्रीचा शुभारंभ मंगळवारी माजी सभापती जयसिंग सोळंके आणि नगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या हस्ते करण्यात आला.



देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम यात्रोत्सवाला दोन दिवसांपूर्वी प्रारंभ झाला आहे. यात्रोत्सवानिमित्त ठोंबरे सराफतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये पुरुषोत्तमपुरी येथे २०० टोप्या, १०० टी-शर्ट तसेच स्टॉलधारक विक्रेत्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. याशिवाय पोलीस प्रशासन, पार्किंग व्यवस्था आणि मंदिर समितीच्या सेवकांसाठी उन्हापासून संरक्षण मिळावे यासाठी सहा टेंटची व्यवस्था करण्यात आली आहे. भगवान पुरुषोत्तमाच्या चांदीच्या नाण्यांच्या विक्रीचा शुभारंभ सोहळा नगराध्यक्ष सहाल चाऊस, माजी सभापती जयसिंग सोळंके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, नगरसेवक भारत होके, नगरसेवक राहुल लंगडे, पत्रकार दिलीप झगडे, पत्रकार कमलेश जाब्रस, शंतनू सोळंके, रामराजे रांजवन आदींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी बोलताना जयसिंग सोळंके यांनी महेश ठोंबरे यांच्या कार्याचे कौतुक केले. ग्राहकांना तत्पर सेवा, शुद्धतेची हमी आणि नवनवीन दागिन्यांच्या आकर्षक डिझाइन्स उपलब्ध करून दिल्यामुळे ठोंबरे सराफने अल्पावधीतच ग्राहकांचा विश्वास संपादन केला असल्याचे त्यांनी सांगितले. भगवान पुरुषोत्तमाची प्रतिमा असलेली ही चांदीची नाणी २ ग्रॅम, ५ ग्रॅम, १० ग्रॅम, २० ग्रॅम आणि ५० ग्रॅम अशा विविध वजनांमध्ये तयार करण्यात आली असून ती भाविकांसाठी विक्रीस उपलब्ध करण्यात आली आहेत. कार्यक्रमास ठोंबरे सराफचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### भगवान पुरुषोत्तमाचे चांदीचे नाणे प्रथमच उपलब्ध

- ठोंबरे सराफतर्फे भगवान पुरुषोत्तमाचे चांदीचे नाणे प्रथमच तयार.
- माजी सभापती जयसिंग सोळंके आणि नगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या हस्ते शुभारंभ.
- यात्रोत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन.
- नाणी २, ५, १०, २० आणि ५० ग्रॅम वजनात उपलब्ध.
- भाविकांसाठी विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली.


# श्रीमान रामगिरी महाराज यांच्या अमृत महोत्सवानिमित्त हातोला तालुका अंबाजोगाई येथे कार्यक्रमाचे नियोजन



➤ **बीड :** श्री रघु बुवा महाराज मठ संस्थान श्रीक्षेत्र हातोला तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड येथे गुरुपुष्यामृत योगावर समाधी जिर्णोद्धार तथा श्री राम गिरीजी महाराज यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तुलाभार व अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन दिनांक 21 मे 2026 गुरुवारी रोजी सकाळी नऊ वाजता संत महानतांचे आगमन व स्वागत सोहळा यांच्या उपस्थितीमध्ये 10 ते 11 संत महंतांचे प्रवचन सकाळी 11 ते 12 समाधी म्हाभिषेक व पुष्प वृष्टी व महा ओरसदाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती महंत श्री संतोष गिरीजी (शिखर सिंगणापूर) राजेंद्र गिरीजी (देवी देवताळा) महंत श्री गुमान गिरीजी (एकंबी) महंत श्री गंगा पूरीजी (जोगण चिंचोली) महंत श्री छत्र गिरीजी (बामनी) महंत श्री रुप गिरीजी (घाटनांदुर) महंत श्री शिवानंद पुरीजी (सौंदना) महंत श्रीकृष्णानंद पुरीजी (हाडोळी) महंत श्री जीवन भारतीजी (औंढा नागनाथ) महंत श्री आनंद गिरीजी (पिंपरी झोला) महंत श्री शरंगीरजी गिरी (लखनगाव) महंत श्री राजेंद्र गिरीजी (बोरोळ) महंत श्री देवगिरी जी (सायखेडा थाना (मध्य प्रदेश) बालयोगी श्री ज्ञानेश्वर महाराज (खरोळा पांढरी) महंत श्री शिव गिरीजी (लखनगाव) महंत श्री शिवगिरीजी (सोरडी जत) महंत श्रु गणेश भारती (दैठणा राडी) महंत श्री सिद्धि गिरीजी (मुडेगाव) बालयोगी भैरव गिरी महाराज (लखनगाव) महंतयांनी संतामाईगिरी दूधपुरी (अंबड) महंतायनी गंगामाई गिरी (लखनगाव) महंतायानी सरस्वती माई गिरी (लखनगाव) महंतायनी अनुसयाबाई गिरी (तिसंगी पंढरपूर) महंतायनी य माऊली गिरीमाई (तळणी किल्लारी) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी विनंती करण्यात येते की मठ संस्थान हातोला तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड येथे या कार्यक्रमास उपस्थित राहवून मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन महंत श्री रामगिरी महाराज मठाधिपती श्री राघोबुवा महाराज मठ संस्थान हातोला यांनी केले आहे

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर



# भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हा कौन्सिलच्या वतीने कार्ल मार्क्सच्या जयंतीदिनी क्रांतिकारी अभिवादन







**बीड : प्रतिनिधी**

जगातील कामगारांनो एक व्हा या क्रांतिकारी घोषणेने एकोणिसाव्या शतकात जगभर भांडवलदारी वर्गाला हादरून टाकणाऱ्या कार्ल मार्क्स च्या साम्यवादी कृतिशील तत्त्वज्ञानाने क्रांती घडवून आणली त्या कार्ल मार्क्सचा जयंतीचे औचित्य साधून दिनांक 5 मे 26 रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष जिल्हा कौन्सिल बीड येथे पक्ष व समविचारी सामाजिक कार्यकर्त्यांनी क्रांतिकारी अभिवादन केले असल्याची माहिती पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख कॉ तुकाराम पवार यांनी दिली आहे.

प्रथम कार्ल मार्क्स यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण व संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी पुष्पहार अर्पण केला यावेळी उपस्थितीना मार्गदर्शन करताना कॉम्रेड नामदेव चव्हाण यांनी कम्युनिस्ट पक्ष केवळ एक पक्ष नसून तो एक विचार आहे जोपर्यंत जगात गरिबी दारिद्र्य भेदभाव शोषित शोषक वर्ग अस्तित्वात आहे तोपर्यंत सत्तेत असो वा नसो कम्युनिस्ट पक्षाचअस्तित्व असणार ज्यांच्यावर अन्याय होतो ज्यांची पिळवणूक होते त्यांना कम्युनिस्ट पक्षाशिवाय दुसरा पर्याय नाही हे अधोरेखित करून सांगितले तसेच कार्ल मार्क्सची आर्थिक परिस्थिती दयनीय असतानाही देखील नाही रे वर्गासाठी अतुलनीय विचारवंत म्हणून त्यांनी केलेले लेखन कार्य अमोल आहे.

संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी दास कॅपिटल या ग्रंथाचे वाचन व अभ्यास करण्याचे आवर्जून सुचविले आहे कॉम्रेड रंजना उरकुडे प्रसंगोचित मनोगत व्यक्त केलेमहाराष्ट्र राज्य किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य कॉम्रेड डीजे तांदळे यांच्या अध्यक्षतेखाली व पक्षाचे जिल्हा सरचिटणीस कॉम्रेड भाऊ प्रभाळे राज्य राज्य कौन्सिल सदस्य कॉम्रेड रंजना हुरकुडे किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड ज्योतीराम हुरकुडे यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमास ज्येष्ठविधीज्ञ हा कॉम्रेड भीमराव चव्हाण कॉ. तुकाराम पवार-ठाकूर, मुख्याध्यापक कॉम्रेड विनोद सवासे, लाडकी लेक अभियान चे जिल्हा समनव्ययक व एकल महिला संघटनेत कार्यरत सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे धम्मा देवडे आयुब खान पठाण अलीम इनामदार शकील फारुकी मोहन वायकर अखिल शेख सलीम शेख गणेश गाडे युसुफ शेख आबरा शेख बाळू गाडे यांच्यासह पुष्कळ कार्यकर्ते उपस्थित होते सभेचे संचालन जिल्हा सेक्रेटरी बहूप्रमाणे यांनी केले तर आभार किसान सभेचे जिल्हा सरचिटणीस कॉम्प्रेस ज्योतीराम मुरकुटे यांनी मांडले





# पिकविम्यानंतर अवकाळी नुकसान भरपाईतही बीड जिल्ह्याची उपेक्षा? शेतकऱ्यांत नाराजी

**बीड / विशेष प्रतिनिधी :**

गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. मात्र, पिकविमा मंजुरीचा प्रश्न अद्यापही अनेक शेतकऱ्यांसाठी प्रलंबित असल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यातच मार्च महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आणखी आर्थिक फटका बसला.

या नैसर्गिक आपत्तीमुळे मका, गहू, हरभरा, ज्वारी, कांदा, टरबूज तसेच आंबा यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाले. शासनाच्या आदेशानुसार संबंधित यंत्रणांनी पंचनामे केले असून, विविध लोकप्रतिनिधींनीही नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली होती. त्यामुळे शासनाकडून मदत मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना



होती.

दरम्यान, १८ मे रोजी राज्य शासनाने अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यास मान्यता दिली. मात्र, या निर्णयामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश नसल्याचा आरोप होत असून, त्यामुळे जिल्ह्यातील सुमारे २२८ हेक्टर क्षेत्रावरील बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील खरीप पिकांचे मोठे नुकसान.
- पिकविमा प्रकरण अद्याप रखडलेले असल्याची शेतकऱ्यांची तक्रार.
- मार्च महिन्यातील अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपिटीमुळे रब्बी व फळपिकांचे नुकसान.
- शासनाने नुकसानग्रस्त जिल्ह्यांसाठी मदतीस मान्यता दिली; मात्र बीड जिल्ह्याचा समावेश नसल्याचा आरोप.
- जिल्ह्यातील सुमारे २२८ हेक्टर क्षेत्रावरील बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची भीती.
- सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी.

## शेतकऱ्यांसाठी सर्वांनी एकत्र यावे – भारत बडे

ामाजिक कार्यकर्ते भारत बडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, पिकविम्यानंतर आता अवकाळी नुकसानभरपाईच्या प्रश्नातही बीड जिल्ह्याच्या शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊनही मदत जाहीर केलेल्या यादीत जिल्ह्याचा समावेश नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

बडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी आमदार धनंजय मुंडे पाठपुरावा करत असून, २६ मे रोजी कृषिमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत पिकविमा आणि अवकाळी नुकसानभरपाई या दोन्ही मुद्द्यांवर ठोस चर्चा होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, शेतकऱ्यांच्या हितासाठी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे शासनाकडे पाठपुरावा करावा आणि बीड जिल्ह्याला नुकसानभरपाईचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

# सौर पंप सर्वेक्षणासाठी हजार रुपयांची लाच; वीज वितरण कंपनीचा प्रधान तंत्रज्ञ एसीबीच्या जाळ्यात

**कन्नड / प्रतिनिधी :**

शासनाच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या सौर पंपाच्या सर्वेक्षणासाठी हजार रुपयांची लाच स्वीकारताना वीज वितरण कंपनीच्या प्रधान तंत्रज्ञास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. ही कारवाई मंगळवारी (दि. १९ मे) तालुक्यातील देवगाव रंगारी येथे करण्यात आली.

संदीप जयराम शिंदे (वय ३७), प्रधान तंत्रज्ञ, वीज वितरण कंपनी, देवगाव रंगारी (ता. कन्नड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराला शासनाच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेअंतर्गत सौर पंप मंजूर झाला होता. या पंपाच्या सर्वेक्षणासाठी आरोपी संदीप शिंदे यांनी तक्रारदाराकडे एक हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● सौर कृषी पंप योजनेच्या सर्वेक्षणासाठी हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप. ● तक्रारदाराच्या तक्रारीनंतर एसीबीकडून पडताळणी. ● देवगाव रंगारी येथे सापळा रचून रंगेहात कारवाई. ● वीज वितरण कंपनीच्या प्रधान तंत्रज्ञास अटक. ● लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची यशस्वी कारवाई.



तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली असता लाच मागणी झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एसीबीने सापळा रचला. मंगळवारी देवगाव रंगारी येथे आरोपीने तक्रारदाराकडून एक हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्याला रंगेहात ताब्यात घेतले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक माधुरी केदार कांगणे, अप्पर पोलिस अधीक्षक शशिकांत सिंगारे आणि पोलिस उपअधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलिस उपअधीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी केली. त्यांना पोलिस हवालदार भीमराज जिवडे व पोलिस अंमलदार अनवेज शेख यांनी सहकार्य केले.

या घटनेमुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीदरम्यान होणाऱ्या भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, लाचखोरीविरोधात नागरिकांनी पुढे येऊन तक्रार नोंदविल्यास अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर प्रभावी आळा बसू शकतो, असे मत व्यक्त होत आहे.



# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात कन्नडमध्ये औषध विक्रेत्यांचा लाक्षणिक बंद

**कन्नड / प्रतिनिधी :**

इंटरनेट फार्मसीच्या माध्यमातून वाढत्या ऑनलाईन औषध विक्रीविरोधात कन्नड शहरातील औषध विक्रेत्यांनी बुधवारी (दि. २० मे) एकदिवसीय लाक्षणिक बंद पाळत तीव्र निषेध नोंदविला. शहरातील सर्व औषध दुकाने बंद ठेवून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला आणि प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.

**आंदोलकांनी मांडलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :**

- **देशात व राज्यात सुरू असलेली ऑनलाईन औषध विक्री तात्काळ बंद करावी.**
- **इंटरनेट फार्मसीमार्फत होणारी बेकायदेशीर औषध विक्री रोखण्यासाठी कठोर नियम लागू करावेत.**
- GSR १७(E) (दि. २० ऑगस्ट २०१८) व कोविड काळातील GSR २२०(E) (दि. २६ मार्च २०२०) निर्णय मागे घ्यावेत.
- **पारंपरिक औषध विक्रेत्यांचे हित जपण्यासाठी ठोस धोरण जाहीर करावे**

औषध विक्रेत्यांनी यापूर्वीही संबंधित मंत्री व प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊन समस्या मांडली होती. मात्र कोणताही ठोस निर्णय न झाल्याने अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या आवाहनावरून हा लाक्षणिक बंद पुकारण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

नायब तहसीलदार (पुरवठा) निलेश राठोड यांनी निवेदन स्वीकारून शासनापर्यंत विक्रेत्यांच्या भावना पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

या आंदोलनात कन्नड शहरासह चापानेर, पिशोर, देवगाव रंगारी व नागापूर परिसरातील औषध विक्रेत्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

# NEET पेपरफुटी प्रकरणी DYFI चे तहसीलदार यांना निवेदन

## विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

**माजलगाव / प्रतिनिधी :**

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या NEET परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, पेपरफुटीच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच संबंधित परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्यात यावी, अशी मागणी डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (DYFI) माजलगाव तालुका कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांना तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले.

DYFI च्या निवेदनात म्हटले आहे की, वैद्यकीय शिक्षणासाठी रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची केंद्र सरकारकडून क्रूर थट्टा करण्यात आली आहे. NEET परीक्षेतील पेपरफुटी आणि निकालातील संशयास्पद बाबींमुळे देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असून हा केवळ घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टाची लूट असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



शैक्षणिक संस्थांच्या वाढत्या व्यापारीकरणामुळे परीक्षांच्या पारदर्शकतेला धोका निर्माण झाला असून नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ही संस्था वारंवार होणाऱ्या पेपरफुटींमुळे विश्वासार्हता गमावून बसल्याची टीकाही निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनावर DYFI चे राज्याध्यक्ष मोहन जाधव, जिल्हाध्यक्ष सुहास झोडगे, तालुका सचिव सय्यद फारुक, जिल्हा कमिटी सदस्य अशोक भुंबे यांची नावे असून विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- NEET पेपरफुटी प्रकरणाची निवृत्त सर्वोच्च न्यायालयीन न्यायाधीशांकडून चौकशी करावी
- पेपरफुटीच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी
- गैरप्रकार झालेल्या परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करावी
- NTA च्या कार्यपद्धतीची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी
- विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवण्याची मागणी

# मराठी तरुणाची 'कॉक्रोच जनता पार्टी' देशभरात ट्रेंडिंग; ५ दिवसांत १० मिलियन फॉलोअर्स!

मुंबई : देशभरात सध्या 'कॉक्रोच जनता पार्टी' या नावाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. सुरुवातीला अनेकांनी हा प्रकार केवळ विनोद किंवा सोशल मीडिया ट्रेंड म्हणून घेतला होता. मात्र अवघ्या काही दिवसांतच या सोशल मीडिया पेजने प्रचंड लोकप्रियता मिळवत देशभरातील तरुणांचे लक्ष वेधून घेतले. केवळ ५ दिवसांत या पेजने इन्स्टाग्रामवर तब्बल १०० लाख म्हणजेच १० मिलियन फॉलोअर्सचा टप्पा पार केला आहे. विशेष म्हणजे फॉलोअर्सच्या बाबतीत या पेजने भाजपच्या पोजला मागे टाकले असून, काँग्रेसच्या अधिकृत अकाउंटलाही मागे टाकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या चर्चेची सुरुवात सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या एका वक्तव्यापासून झाली. काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात. काही लोक कायदा, माध्यमं आणि आरटीआयसारख्या व्यवस्थांमध्ये झुरळांप्रमाणे घुसखोरी करतात, असे विधान त्यांनी केले होते. नंतर त्यांनी हे वक्तव्य सर्वसामान्य बेरोजगार तरुणांसाठी नसून बनावट पदव्या आणि चुकीच्या मार्गांचा वापर करणाऱ्यांसाठी असल्याचे स्पष्ट केले.

**तज्ज्ञांचे प्रतिपादन** ➤ वार्षिक सर्वसाधारण सभा व तांत्रिक चर्चासत्र पशु सर्वचिकित्सालय, लातूर येथे उत्साहात

# देवणी गोवंश संवर्धनासाठी आधुनिक पैदास तंत्रज्ञानाची गरज

**लातूर / प्रतिनिधी**

देवणी गोवंशाचे जतन आणि संवर्धन करताना केवळ पशुप्रदर्शन किंवा बाह्य रंगरूपावर भर न देता दूध उत्पादकता, उत्कृष्ट वंशावळ आणि आधुनिक पशुपैदास तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. देवणी गोवंश जतन व पैदासकार असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा व तांत्रिक चर्चासत्र नुकतेच पशु सर्वचिकित्सालय, लातूर येथे उत्साहात पार पडले.

सभेच्या अध्यक्षस्थानी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भास्कर बोरगावकर होते. व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा. डॉ. अनिल भिकाने, कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. बाबासाहेब ठोंबरे, जिल्हा पशुसंवर्धन




उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, उपाध्यक्ष बच्चेसाहेब देशमुख, सचिव डॉ. महादेव जगताप व कोषाध्यक्ष डॉ. श्रीधर शिंदे उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी देवणी गोवंशाचा इतिहास, उत्पत्ती आणि पैदास व्यवस्थापनावर सविस्तर मार्गदर्शन केले. गुजरातमधील गीर व स्थानिक डोंगरी गोवंशाच्या संकरातून देवणी गोवंश निर्माण झाल्याचे सांगत त्यांनी पशुपालकांनी केवळ रंगावर न जाता दूध उत्पादन, शरीर क्षमता आणि वितांची संख्या यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. गाभण काळातील योग्य व्यवस्थापनामुळे अधिक वजनाचे व सुदृढ वासरू मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रा. डॉ. अनिल भिकाने यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सर्वसामान्य शेतकऱ्याला परवडणारी, अधिक उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर देवणी गाय विकसित करण्यासाठी उत्कृष्ट वंशावळीच्या नियोजनबद्ध पैदाशीवर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. वळूची निवड केवळ बाह्य स्वरूपावर न करता त्याच्या आईची दूध देण्याची क्षमता, सातत्यपूर्ण उत्पादन व आनुवंशिक गुणधर्म लक्षात घेऊन करावी. शेतीकामासाठी बैलांची गरज कमी होत असल्याने सेक्सड सिमेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च उत्पादनक्षम मादी वासरांची पैदास करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

डॉ. राजकुमार पडिले यांनी देवणी गोपालकांनी केवळ पशुप्रदर्शनापुरते मर्यादित न राहता उत्कृष्ट पैदासकार बनण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेचा लाभ घेऊन उत्कृष्ट वंशावळीच्या गाईंची प्रक्षेत्रे उभारण्यासाठी प्रगतिशील पैदासकार, शेतकरी व संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे ते म्हणाले. तसेच या योजनेत वासरांसाठी खावटीचे प्रावधान असल्याची माहिती देत पशुप्रदर्शनात बैलजोडी गटाचा समावेश करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. भास्कर बोरगावकर यांनी वळूंना अतिरिक्त खाद्य देऊन स्थूल बनविण्याऐवजी नियमित व्यायाम देण्याचा सल्ला दिला.

बैठकीच्या प्रारंभी सचिव डॉ. महादेव जगताप यांनी प्रास्ताविक करत संस्थेच्या कामकाजाचा व आर्थिक अहवाल सादर केला. कार्यकारिणीच्या पुनर्रचनेबाबत चर्चा होऊन विद्यमान कार्यकारिणी कायम ठेवत नवीन सदस्यांचा समावेश करण्यावर एकमत झाले. संस्थेचे सदस्यत्व वाढविण्यासाठी व्यापक नोंदणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यक्रमात उत्कृष्ट देवणी गोपालक श्याम बरुरे, संजय जाधव, सोनेराव लवटे, व्यंकट कामले, नारायण गुरुडे, सविचार कांबळे, रमेश सुर्यवंशी, अमोल शिंदे, गौरव शिरूरे, जमीर रज्जाक पटेल, नाजीम युसूफ पटेल, वैभव शिरूरे, धोंडिराम तरडे व कमलाकर मुळे यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन डॉ. महादेव जगताप यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले. कार्यक्रमास कृषि विज्ञान केंद्रांचे डॉ शरद साळुंके सहे देवणी गो पैदासकार व पशुवैद्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड · वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com